# पारनेर दर्शन

वर्ष १ अंक २४२, बुधवार १२ जुन २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये




■ राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्धापनदिनानिमित्त नगर येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात शरद पवार यांनी मार्गदर्शन केले. (छाया : मनोज शिंदे,पळसपूर)

# खा.नीलेश लंके संसदेत कामाचा ठसा उमटवतील - खा. शरद पवार

## ■ नगर येथे राष्ट्रवादी काँग्रेसचा रौप्यमहोत्सवी वर्धापनदिन ■ राष्ट्रवादी कार्यकर्त्यांचा मोठा प्रतिसाद

**नगर : सुदेश आबूज**

**नगर लोकसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित खासदार नीलेश लंके हे संसदेमध्ये आपल्या कामाचा ठसा उमटवतील आणि नगरकरांनी टाकलेला विश्वास सार्थ ठरवतील असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केला.**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा २५ वा वर्धापनदिन नगर येथील न्यू आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेजच्या मैदानावर मोठया उत्साहात पार पडला. यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे, खासदार सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे, नीलेश लंके, धैयशिल मोहिते पाटील, भास्कर भगरे, सुरेश म्हात्रे, अमर काळे, बजरंग सोनवणे, आ. रोहित पवार, प्राजक्त तनपुरे, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, शेतकरी कामगार पक्षाचे जयंत पाटील, जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर यांच्यासह मोठया संख्येने राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

लोकसभेमधील आमचे जुने सभासद नीलेश लंके हे पार्लमेंटमध्ये आल्यानंतर नक्कीच विचारतील की हा कोण ? या ठिकाणी आणला ? असे सांगत शरद पवार यांनी एका बलाढय उमेदवाराला पराभूत करून संसदेमध्ये गेलेल्या नीलेश लंके यांच्याविषयी देशभरातील खासदारांमध्ये उत्सुकता असेल असे निदर्शनास आणून दिले.

संसदेमध्ये भाषण करताना तिथे मराठीतही बोलता येते. निवडणूकीच्या काळात कोणीतरी म्हणत होते की इंग्रजीत का नाही बोलत ? तुम्ही मराठीतही बोलू शकता. एकदा माईक हातात आला तर नीलेशजी मराठीत काय बोलतील याचा भरोसा नसल्याचे सांगत लंके यांच्या भाषणशैलीचे खा. पवार यांनी कौतुक केले.

आमचे हे आठही खासदार तुम्हा सर्वांची सेवा चांगल्या पध्दतीने करतील अशी अपेक्षा या ठिकाणी व्यक्त करतो. यांना खासदारकी देण्यासाठी जनतेचा पाठींबा, तसेच राष्ट्रवादीचा कार्यकर्ता रात्रीचा दिवस करून जयंतराव पाटलांच्या नेतृत्वाखाली प्रचंड मेहनत त्यांनी घेतली. या सगळयांची नोंद आम्ही कायम घेऊ अशी ग्वाही पवार यांनी यावेळी दिली.

आजचा दिवस हा पक्षाचा वर्धापन दिवस आहे. सुदैवाने हा आनंद साजरा करण्यासाठी महाराष्ट्राच्या जनतेने यंदा झालेल्या निवडणूकीमध्ये दहा पैकी आठ जागा निवडून देऊन या वर्धापनदिनाचा एक अतिशय उत्तम प्रकारे साथ दिली असल्याचे पवार म्हणाले. २५ वर्षांपूर्वी या पक्षाची आपण स्थापना केली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जायचं हे ठरवलं. पण भाग्य असं, पक्ष स्थापन केला आणि ३ महिन्यांच्या आत महाराष्ट्राच्या सत्तेच्या राजकारणात प्रभावीपणे काम करण्याची संधी महाराष्ट्रातल्या जनतेने या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला दिली. तेव्हापासून जवळपास १७ ते १८ वर्षे सतत महाराष्ट्राच्या जनतेने या राष्ट्रवादी काँग्रस पक्षाला संधी दिली. महाराष्ट्राबरोबरच केंद्र सरकारमध्येही काम करण्याची संधी दिली. केंद्रातील सरकारमध्ये राष्ट्रवादीचा वाटा सुध्दा मोलाचा होता. असे पवार म्हणाले.

### ये ट्रेलर झाँकी है !

नीलेश लंके यांनी आपल्या भाषणास सुरूवात करण्यापूर्वी ते व्यासपीठावरून उपस्थित जनसमुदायापुढे नमस्तक झाले. त्यानंतर कॉलर उडवत स्वत: केलेल्या पराक्रमाचा अभिमान असल्याचे दाखवून दिले. आपल्या भाषणात लोकसभा निवडणूक ट्रेलर झाकी है, अभी पिक्चर बाकी है असे सांगत जिल्हयातील बाराही जागा महाविकास आघाडीच्या निवडणूक आणण्याची त्यांनी प्रतिज्ञा केली. या सोहळयादरम्यान लंके यांनी कॅमेरा हाती घेऊन कार्यक्रमाचे चित्रीकरणही केले.

### म्हणून अहिल्यानगरची निवड

पक्षाचा रौप्यमहोत्सवी वर्धापनदिन साजरा करण्यासाठी अहिल्यानगरची निवड करण्यात आली. अहिल्यादेवी होळकर यांचे कर्तुत्व, त्यांची दृष्टी, त्यांचे प्रशासन कौशल्य हा तुम्हाला अभिमान वाटणारा विषय आहे.

### विधानसभा निवडणूकीत कष्ट करायचे आहेत

आज त्यांनी वेगळी भूमिका घेतली आणि ते केवळ तुमच्या सर्वांच्या मदतीने. ठीक आहे त्यांनी काय केले. आपण पुढे जायचे आहे. पुढे जात असताना एक नवीन कर्तुत्ववान फळी उभी करायची, जनतेचं संरक्षण मिळवायचं आणि महाराष्ट्रापुरतं सांगायचं झालं तर महाराष्ट्रच नव्हे तर महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड या तिन्ही राज्यांमध्ये तीन महिन्यांनी निवडणूका आहेत. त्या निवडणूकांमध्ये आपल्याला कष्ट करायचे आहेत. आणि त्या ठिकाणी सरकार आणायचं आहे. आणि ते सरकार आणून लांकांना एक प्रकारचा विश्वास द्यायचा आहे.

### मोदी सरकार आणि गॅरंटी राहिलेली नाही

आज काय पाहातोय आपण ? पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदींनी शपथ घेतली. त्यांनी शपथ घेण्यापूर्वी त्यांना देशाचा जनादेश काय होता ? देशाच्या जनतेने त्यांना सहमती दाखविला होती ? त्यांचे बहुमत नव्हते. तेलगू देसम आणि बिहारच्या मुख्यमंत्र्यांची त्यांनी मदत घेतली. त्यामुळे आज त्यांचं राज्य झालेलं आहे. हे वेगळे सरकार आहे. तुम्हाला आठवत असेल, या निवडणूकीच्या काळात मोदी हे जाईल त्या ठिकाणी भारताचे सरकार कधी म्हणत नव्हते. मोदी सरकार म्हणत होते, मोदी गॅरंटी म्हणत होते. आज ती मोदी गॅरंटी राहिलेली नाही. आज ते मोदी सरकार राहिलेलं नाही. आज तुम्ही लोकांनी तुमच्या लोकशाहीच्या मताच्या अधिकाराच्या जोरावर लोकांना सांगावं लागलं की हे मोदी सरकार नाही तर एनडीए गव्हर्नमेंट आहे. भारत सरकार आहे.

### इतिहास निर्माण करायचा आहे

सत्ता हातात येते, त्या सत्तेचं समर्थन करणं, सत्ता जर मिळविण्याची शक्यता नसली तरी माणूस बेफाम आणि कसा अस्वस्थ होतो. त्या प्रकारची स्थिती त्यांनी या ठिकाणी दाखविली, ठिक आहे. त्यांच्याकडून झालं आपण ते विसरू या. नव्या विचारांनी जाऊ या. आपण देश कसा प्रगतीच्या रस्त्यावर न्यायचा, त्याचा विचार आपण करू या. आणि ते करण्यासाठी अनेक गोष्टी आपल्याला कराव्या लागतील. संघटना मजबुत करावी लागेल. समाजातील जो दलित वर्ग आहे, अल्पसंख्यांक वर्ग आहे, महिलांचा वर्ग आहे, छोटे-मोठे घटक आहेत त्यांच्या हिताची जपवणूक हे करण्यासबंधी आपल्या सर्वांना घ्यायची आहे. हे करणारा पक्ष कोणता तर तो राष्ट्रवादी पक्ष आहे हा इतिहास निर्माण करायचा आहे असे पवार म्हणाले.

### अष्टप्रधान मंडळ महाराष्ट्राच्या हिताची जपवणूक करेल

सुदैवाने सुप्रिया आणि कोल्हे साहेब हे दोन अनुभवी सदस्य आहेत. सुप्रियाची चौथी टर्म तर कोल्हेंची दुसरी टर्म आहे. संसदपटू हा सन्मान या दोघांनाही मिळाला आहे. त्यांची मदत या सदस्यांना होईल. त्यांच्या मार्फत तुमच्या जिल्हयाचे, तुमच्या मतदारसंघाचे, राज्याचे जे महत्वाचे प्रश्न असतील ते प्रभावीपणे मांडले जातील. हे आठही लोक माझ्या दृष्टीने छत्रपती शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ होतं तसं हे महाराष्ट्राच्या जनतेनेचे अष्टप्रधान महाराष्ट्राच्या हिताची जपवणूक करतील याची खात्री मी देतो.

**शरद पवार**
अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

### खासदार तुमच्या प्रश्नांसाठी जागरूक राहतील

तुम्ही चांगले लोक निवडूण दिले. आठही खासदार लोकांच्या सुख, दु:खाशी संबंध ठेवणारे आहेत. या पक्षाचा नेता म्हणून मी खात्री देतो की आमचे खासदार दिल्लीला जातील, तुमच्या प्रश्नांसाठी सतत जागरूक राहतील. नव्याने आलेल्या लोकांना मार्गदर्शन हवे असेल तर काही दिवस मी त्या ठिकाणी आहे. पार्लमेंट आणि विधानसभेत जाऊन मलाही ५६ वर्षे पुर्ण होत आहेत. आणखी किती वर्षे रहायचं ? ५६ वर्षे एकाही दिवसाची सुटी नाही. असं काम महाराष्ट्राच्या जनतेने माझ्यावर सोपवलं. मला जे काही या संबंधित ज्ञान असेल ते या आठही जणांच्या माठीमागे कायम राहील. त्यांच्यामार्फत काम करून घेतले जाईल असे पवार म्हणाले.

### भटकता आत्मा तुम्हाला सोडणार नाही !

राजकीय पक्ष एकमेकांवर टीका करतात. टीका करताना सुध्दा आम्ही काही मर्यादा ठेवतो. काय बोलले मोदी ? माझ्या बाबतील बोलले की भटकती आत्मा ! ते असं बोलले ते एका दृष्टीने बरं झालं. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आत्मा हा कायम राहतो. हा कायम राहणारा आत्मा तुम्हाला सोडणार नाही. कारण तो कायम त्या ठिकाणी राहणार आहे. त्यांनी उल्लेख केला शिवसेनेच्या संदर्भात. बाळासाहेब ठाकरेंनी शिवसेनेची निर्मिती केली. त्यांनी राज्य केले. मराठी माणसाला आत्मविश्वास दिला. आणि त्यांना उल्लेख करत असतानाही नकली बापाची संघटना ? हे बोलणं शोभते ? याचा अर्थ हा आहे की त्यांना तारतम्य राहिलेलं नसल्याचे पवार म्हणाले.

## कोण, काय म्हणाले ?

**विरोधकांनाच विश्राम दिला**

''संघर्ष करण्याची ताकद पवार साहेबांमुळे मिळाली. शेतकरी, युवा आदी सामान्य लोकांना पवार साहेबांनी न्याय दिला. त्यामुळे लोकसभेत मोठा विजय मिळाला. दहा पैकी आठ खासदार निवडून आले. पवार साहेबांनी विश्राम घेतला पाहिजे, असे म्हणणाऱ्या विरोधकांना निवडणुकीत चितपट करून त्यांनाच विश्राम दिला आहे. विधानसभेत भाजप नक्कीच हद्दपार होईल,'' अशी टीका त्यांनी विरोधकांवर केली.

**आ.रोहित पवार**

**लंके यांना पंतप्रधान ओळखू लागले**

''देशाचे पंतप्रधानही लंके यांनाही ओळखू लागले आहे. मी थोडा कमी पडलो. पण लढलो. तुतारी आणि पिपाणी यात गोंधळ झाल्यामुळे माझा पराभव झाला. परंतु, विधानसभेला आणखी जोमाने लढून शरदचंद्र पवारांच्या विचारांचं सरकार महाराष्ट्रात आणू, असे ते म्हणाले.''

**शशिकांत शिंदे**

**महाविकासचा झेंडा फडकेले**

''आपली पक्षाची सभा मैदानात, विरोधकांची सभा हॉलमध्ये झाली, अशी टीका अजित पवार यांच्या राष्ट्रवादीवर त्यांनी केली आहे. आगामी विधानसभेत महाविकास आघाडीचा झेंडा फडकेल,'' असा विश्वास आहे.

**आ.प्राजक्त तनपुरे**

**सर्व घटकांना सोबत नेणारे नेतृत्त्व**

''शरद पवार साहेब हे सर्व घटकांना सोबत घेऊन चालणारे नेतृत्त्व आहे. धनगर समाजाला मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे. आगामी विधानसभेत महाविकास आघाडीचे शंभर उमेदवार निवडणून आले पाहिजे, त्यासाठी आम्ही प्रयत्नांची परकाष्ठा करणार आहोत.''

**उत्तमराव जानकर**
नेते, धनगर समाज

**संसदेत आवाज उठवणार**

''पवार साहेबांनी माझ्या सारख्या कार्यकर्त्याला संधी दिली. यापुढे मायबाप जनेतला न्याय देण्यासाठी संसदेत आवाज उठवणार आहे. ''

**खा.भास्कर भगरे**

**पवार साहेबांचा देशात जरब**

''पवार साहेबांचा जरब देशात आहे. पंतप्रधान, योगी आदित्यनाथ आदी दिग्गज नेत्यांना माझ्या मतदारसंघात प्रचाराला यावं लागले. परंतु, पवार साहेबांची किमया मला जनतेने मला निवडून दिले. आगामी विधानसभेसाठी जीवाची बाजी लावून कमीत कमी ८५ आमदार निवडून आणण्यासाठी रक्ताचं पाणी करू.

**खा.बजरंग सोनवणे**

**तर संसदच बंद करु**

''विधानसभेवर आता झेंडा फडकवायचा आहे. नगर जिल्ह्यातील बारा आमदार निवडून आणण्यासाठी जीवाचे रान करणार आहे. पवार साहेबांच्या तालमीतला मी पठ्या आहे. संसदेत जर शेतकऱ्यांना न्याय मिळाला नाही, तर संसदच बंद करू, असे आश्वासन शेतकऱ्यांना दिले. सगळ्यांचा नाद करायचा, पण पवार साहेबांचा नाद नाही करायचा.''

**खा.नीलेश लंके**

**पुन्हा महाराष्ट्र पिंजून काढणार**

''सुजल्यावर कळतयं की पवार साहेबांनी मारलं कुठं, हा कोल्हापूर शैलीत लावलेलं बॅनरनी चांगल्यांची जिरवली आहे. शेतकरी समाज तुम्हाला विधानसभेला खाली खेचल्याशिवाय राहणार नाही. घरवापसी करणाऱ्या आमदारांपेक्षा निष्ठावान कार्यकर्त्यांचा विचार करावा. विधानसभेला पुन्हा महाराष्ट्र पिंजून काढणार आहे.''

**खा.अमोल कोल्हे**

**देशाचा खरा नेता पवार साहेब**

''देशाचा खरा नेता कोण, तर शरद पवार साहेब आहे. आगामी विधानसभेला मराठवाड्यातील सर्वाधिक आमदार निवडून आणण्याचे काम करणार आहे.''

**अमर काळे**

**'मनुस्मृती हेच भाजपाचे संविधान**

''पुरोगामी विचारच जिवंत राहिला पाहिजे. ही भूमिका साहेबांनी घेतली. भाजपला ४०० पार करून संविधान बदलायचे होते. आज त्यांच्या जागा आल्या नाही, तर आता म्हणतात आम्हाला संविधान बदलायचे नव्हते. मनुस्मृती हेच भाजपचे संविधान आहे. परंतु, आम्ही तुम्हाला मनुस्मृती आणून देणार आहे.''

**आ.जितेंद्र आव्हाड**

**आठ खासदार संसदरत्न होणार**

''पक्षाच्या २५ वर्षांच्या प्रवासात अनेकांचे योगदान आहे. पक्ष १८ वर्ष सत्तेत राहिला आहे. पुढच्या तीन महिन्यात एकच लक्ष्य आणि विधानसभा जिंकून आणायची आहे. संसदेत पहिला दुधाच्या प्रश्नासाठी आवाज उठवणार आहे. आठ खासदार आता संसदरत्न होणार आहे.''

**खा.सुप्रिया सुळे**

**महाराष्ट्रात एकमेव टायगर**

''महाराष्ट्रात एकमेव टायगर आहे. तो म्हणजे पवार साहेब आहे. भिवंडी लोकसभा मतदारसंघात बाळ्यामामाने एका मंत्र्यांला पाडले. तो खरा आमच्या आग्री समाजाचा हिरो आहे.''

**जयंत पाटील**
नेते,शेकाप

**विधानसभेत नव्या चेहऱ्यांना संधी**

''महाराष्ट्राभर पवारांची लाट आपण पाहिली. काही लोकांनी पवार साहेबांना बारामती अडकून ठेवण्याचा प्रयत्न केला. परंतु, महाराष्ट्रभर पिंजून काढून पवार साहेबांनी दहा पैकी आठ खासदार निवडून आणले. रिश्ते मै तो हम तुम्हारे बाप आहे, नाम है शरद पवार, असा डायलॉग मारून त्यांनी विरोधकांना डिवचलं आहे. विधानसभेत नव्या चेहऱ्यांना पवार साहेब संधी देतील. आमचे खासदार संसदेत आदर्श काम करतील. राज्याच्या आणि देशाच्या नेतृत्वाला नापसंती दिली आहे. आगामी विधानसभेला एकजुटीने काम करा, विजयाची पताका मोठ्या ताकदीने पुढे नेऊ. ''

**जयंत पाटील**
प्रदेशाध्यक्ष,राष्ट्रवादी

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार



## कडधान्यांची पेरणी करताना...

■ मूग, उडीद : मध्यम ते भारी, चांगला निचरा होणारी जमीन आवश्यक असते. पाणी साचून राहणारी, क्षारपड, चोपण किंवा अत्यंत हलकी जमिन टाळावी. पेरणीयोग्य पाऊस झाल्यावर आणि जमिनीत वापसा येताच म्हणजे जूनच्या दुसऱ्या पंधरवड्यामध्ये पेरणी पूर्ण करावी. पेरणीला जस जसा उशीर होईल त्याप्रमाणे उत्पादनात घट येते. मुगात वैभव व बी.पी.एम. आर.-१४५ या दोन जाती रोगप्रतिकारक व अधिक उत्पादन देणाऱ्या आहेत. उडीदामध्ये टीपीयू-४ व टीपीयू-१ या जाती चांगले उत्पादन देतात. प्रति किलो बियाण्यास २५ ग्रॅम रायझोबियम व २५ ग्रॅम पीएसबी या जीवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी. मुग व उडीद ही पिके अतिशय कमी कालावधीची (७० ते ८०) असल्यामुळे सलग अथवा आंतरपीक म्हणून घेतले जाते. या दोन्ही पिकाचे दोन ओळीत ३० सें.मी. व दोन रोपांमधील अंतर १० सें.मी. राहील या बेताने पेरणी करावी. पेरणीकरिता १५-२० किलो प्रति हेक्टर बियाणे वापरावे. दोन्ही पिकांना २० किलो नत्र आणि ४० किलो स्फुरद म्हणजेच १०० किलो डीएपी प्रति हेक्टरी द्यावे. पेरणी दोन चाड्याच्या पाभरीने करावी. या पिकात तुरीचे आंतरपीक घ्यावयाचे असल्यास मुख्य पिकाच्या दोन ते चार ओळीनंतर एक ओळ तुरीची पेरावी.

■ चवळी : मध्यम ते भारी पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन या पिकास योग्य असते. पाणथळ, चोपण, क्षारयुक्त जमिनीत या पिकाची लागवड टाळावी. पेरणीकरिता १५ ते २० किलो बियाणे प्रति हेक्टरी वापरावे. सीना, माण व फुले सकस या जातींची निवड करावी. पेरणी ४५ बाय १० सें.मी. अंतरावर करावी. प्रति किलो बियाण्यास २५ ग्रॅम रायझोबियम व २५ ग्रॅम पीएसबी या जीवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी. पेरणी करताना २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरद या प्रमाणे रासायनिक खतांची मात्र द्यावी. यासाठी १२५ किलो डीएपी प्रति हेक्टरप्रमाणे पेरणी करताना खत द्यावे.

■ हुलगा, मटकी : हलकी ते मध्यम माळरानाची, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन या पिकास योग्य असते. पाणथळ, चोपण, क्षारयुक्त जमिनीत या पिकाची लागवड टाळावी. हेक्टरी १२ ते १५ किलो बियाणे पेरणीकरिता वापरावे. पेरणी ३० बाय



१० से.मी अंतरावर करावी. प्रती किलो बियाण्यास २५ ग्रॅम रायझोबियम व २५ ग्रॅम पीएसबी या जीवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी. पेरणीच्या वेळेस १२-१५ किलो नत्र आणि २५-३० किलो स्फुरद याप्रमाणे रासायनिक खतांची मात्र द्यावी, म्हणजेच ७५ किलो डीएपी प्रति हेक्टरप्रमाणे पेरणी करताना खत द्यावे.



■ बाजरी : बाजरी पिकासाठी पाण्याचा उत्तम निचरा होणारी हलकी ते मध्यम जमीन निवडावी. हलक्या जमिनीत बाजरी हे पीक घ्यावयाचे असल्यास सरी- वरंबा पद्धत फायदेशीर ठरते. पेरणी १५ जून ते १५ जुलैदरम्यान करावी. पेरणीकरिता फुले आदिशक्ती, फुले महाशक्ती या संकरित जाती आणि धनशक्ती ही सुधारित जात निवडावी. हेक्टरी ३ ते ४ किलो या प्रमाणात बियाणे वापरावे. प्रति किलो बियाण्यास २५ ग्रॅम ॲझोटोबॅक्टर व २५ ग्रॅम पीएसबी जीवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी. पेरणी २ ते ३ सें. मी. पेक्षा जास्त खोलीवर करू नये. कोरडवाहू क्षेत्रात ४५ बाय १५ सें. मी. व नियमित पावसाच्या ठिकाणी अथवा पाण्याची सोय असल्यास ३० बाय १५ सें. मी. अंतरावर पेरणी करावी. पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास प्रत्येकी २५ ग्रॅम अझोस्पिरीलम व स्फूरद विरघळवणाऱ्या जीवाणू संवर्धनाची बीजप्रक्रिया करावी. पेरणी करताना ४० किलो नत्र, २० किलो स्फुरद आणि २० किलो पालाश हलक्या जमिनीत तर मध्यम जमिनीत ५० किलो नत्र २५ किलो स्फूरद आणि २५ किलो पालाश प्रतिहेक्टरी द्यावे. पेरणीच्या वेळी अर्धे नत्र व संपूर्ण स्फूरद व पालाश आणि २५ ते ३० दिवसांनी अर्धे नत्र जमिनीत ओलावा असल्यास द्यावे. रासायनिक खते दोन चाडीच्या पाभरीने पेरून द्यावे.

## ओलाव्याशिवाय करू नका पेरणी

■ सोयाबीन : पेरणीकरिता मध्यम काळी पोयट्याची, चांगला निचरा होणारी जमीन निवडावी. पेरणी खरिपात जूनच्या पहिल्या पंधरवड्यात वापशावर करावी. भारी जमिनीत पेरणी ४५ बाय ५ सें. मी. आणि मध्यम जमिनीत ३० बाय १० सें. मी. अंतरावर करावी. सलग पेरणीकरिता ७५-८० किलो प्रति हेक्टर तर टोकण करण्याकरिता ४५-५० किलो प्रति हेक्टरी बियाणे वापरावे. पेरणीकरिता जे.एस.३३५, एम.ए.सी.एस ११८८, फुले कल्याणी (डी.एस. २२८), जे. एस. ९३०५, के. एस. १०३, फुले अग्रणी (केडीएस ३४४) आणि फुले संगम (केडीएस ७२६) या जातींची निवड करावी. प्रतिकिलो बियाण्यास २५ ग्रॅम रायझोबियम व २५ ग्रॅम पीएसबी या जीवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी. आंतरपिकामध्ये सोयाबीन अधिक तूर (३:१) या प्रमाणात घ्यावे. सोयाबीन पिकास हेक्टरी ५० किलो नत्र, ७५ किलो स्फूरद आणि ४५ किलो पालाश पेरणीच्या वेळी द्यावे. खते पेरणीपूर्वी जमिनीत मिसळून द्यावीत अथवा दोन चाड्याच्या पाभरीने खते व बियाणे एकाच वेळी पेरून द्यावे.


■ तूर : पेरणीकरिता लवकर तयार होणारे आयसीपीएल ८७, विपुला, फुले राजेश्वरी, बीडीएन ७११ या जातींची निवड करावी. लागवडीसाठी ९० बाय ६० सें. मी. अथवा १८० बाय ३० सें.मी. अंतर ठेवावे. याशिवाय बीएसएमआर ७३६, बीएसएमआर ८५३ हे मध्यम उशिरा येणाऱ्या जातींची निवड करावी. प्रती किलो बियाणास २५ ग्रॅम रायझोबियम व २५ ग्रॅम पीएसबी या जीवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी. पेरणी करतेवेळी प्रति हेक्टरी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद म्हणजेच १२५ किलो डीएपी वापरावे. पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी. हेक्टरी जातीपरत्वे १० किलो बियाणे वापरावे. टोकण पद्धतीने पेरणी केल्यास बी कमी लागेल.



## खरीप हंगामात सोयाबीन पेरताना...



**महाराष्ट्र राज्यात अलीकडील काळात सोयाबीन क्षेत्रात वाढ झाली आहे. योग्य लागवड तंत्राचा वापर, कृषी विद्यापीठांच्या शिफारशींचा अवलंब केल्यास या पिकाचे हेक्टरी उत्पादन वाढवण्यास चांगला वाव आहे. त्यादृष्टीने एकात्मिक व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांनी करावा. सोयाबीन लागवड मध्यम ते भारी, पाण्याचा चांगला निचरा होणाऱ्या जमिनीत करावी. अत्यंत हलक्या जमिनीत उत्पादन कमी येते. पूर्व मशागत – उन्हाळ्यात एक नांगरणी आणि वखराच्या २ ते ३ पाळ्या देऊन जमीन समपातळीत करावी. शेवटच्या वखराच्या पाळीपूर्वी २० गाड्या शेणखत जमिनीवर पसरून द्यावे.**



### वाणांची निवड

#### पेरणीची वेळ

पेरणी १५ जून ते १५ जुलैदरम्यान करावी. साधारणपणे ७५ ते १०० मि. मी. पाऊस झाल्यावरच पेरणी करावी.

सोयाबीनचे अनेक सुधारित व अधिक उत्पादन देणारे वाणे उपलब्ध आहेत. यात एमयूएस ४७ (परभणी सोना), एमएयूएस ६१ (प्रतिकार), एमएयूएस ६१-२ (प्रतिष्ठा), एमएयूएस ७१ (समृद्धी), एमएयूएस ८१ (शक्ती), एमएयूएस १५८, एमएयूएस १६२, जेएस ३३५ ( जवाहर), जेएस ९३-०५, जेएस ९५-६०, एनआरसी ३७ (अहिल्या), डीएस २२८ (फुले कल्याणी), एमएसीएस ४५०, एमएसीएस ११८८, केडीएस ३४४ (फुले अग्रणी) हे वाण महाराष्ट्रासाठी शिफारस केले आहेत.

■ यांत्रिक पद्धती : कीडग्रस्त झाडे, पाने, फांद्या यांचा आतील किडींसह नायनाट करावा. तंबाखूची पाने खाणारी अळी, केसाळ अळी यांची अंडी व अळीग्रस्त पाने अलगद तोडून किडींसह नष्ट करावीत. हिरवी घाटे अळी व तंबाखूची पाने खाणारी अळी यांच्या प्रादुर्भावाची पातळी समजण्यासाठी हेक्टरी पाच कामगंध सापळे शेतात लावावेत. शेतात इंग्रजी टी अक्षरासारखे पक्षीथांबे लावावेत.

■ जैविक पद्धती : पाच टक्के निंबोळी अर्क किंवा अझाडिरेक्टीनची शिफारसीनुसार फवारणी करावी. तंबाखूवरील पाने खाणाऱ्या (स्पोडोप्टेरा लिट्युरा) अळीच्या नियंत्रणासाठी एसएलएनपीव्ही (५०० एलई) विषाणूजन्य कीटकनाशक २ मि.ली. प्रति लिटर पाणी किंवा नोमुरिया रिलाई या बुरशीजन्य कीटकनाशकाची ४ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून प्रादुर्भाव आढळताच फवारणी करावी.

### एकात्मिक कीडनियंत्रण

कीडनियंत्रणाच्या मशागतीय पद्धती : लागवड करण्यापूर्वी शेतात उन्हाळी नांगरट करावी. मुख्य पिकाभोवती एरंडी आणि सूर्यफूल या सापळा पिकांची एक ओळ लावावी. त्यावरील तंबाखूवरील पाने खाणारी अळी आणि केसाळ अळी यांची प्रादुर्भावित पाने अळ्यांसहित नष्ट करावीत. पेरणी जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत संपवावी. सरी वरंबा किंवा पट्टा पद्धतीने लागवड केल्यास कीटकनाशकाची फवारणी करणे सोयीचे होईल. सुरुवातीच्या अवस्थेत पीक तणमुक्त ठेवावे. बांधावर असणाऱ्या किडींसाठी पूरक वनस्पतीचे नियंत्रण करावे. पीक फेरपालट करावी. सोयाबीननंतर भुईमुगाचे पीक घेऊ नये.



### बीज प्रक्रिया...

■ पेरणी करण्यापूर्वी बियाण्यास कार्बेन्डाझिम ३ ग्रॅम किंवा थायरम ४.५ ग्रॅम किंवा थायरम अधिक कार्बोक्झीन (संयुक्त बुरशनाशक) ३ ग्रॅम बियाण्यांनुसार प्रक्रिया करावी. त्यानंतर रायझोबीयम २५ ग्रॅम व स्फुरद विरघळणारे जीवाणू २५ ग्रॅम प्रति किलो बियाणे यामाणे प्रक्रिया करावी. खोड माशीच्या नियंत्रणासाठी थायामेथोक्झाम (३० टक्के एफएस) १० मिली प्रति किलो बियाणे अशी प्रक्रिया करावी.

### लागवडीचे अंतर

■ दोन ओळींतील अंतर ४५ सें.मी. आणि दोन रोपांतील अंतर ५ सें.मी. ठेवून पाभर किंवा ट्रॅक्टरचलित यंत्राद्वारे पेरणी २.५ ते ३.५ सें.मी. खोलीपर्यंत करावी. जास्त खोलवर पेरणी केल्यास उगवणीवर परिणाम होतो.

### बियाणे प्रमाण

■ ६५ किलो बियाणे प्रति हेक्टर वापरून झाडाची संख्या ४.४ ते ४.५ लाख प्रति हेक्टर ठेवावी. बियाण्याची उगवण क्षमता ७० टक्क्यांपेक्षा कमी असेल तर त्यानुसार बियाण्याचे प्रमाण ५ ते १० किलो प्रति हेक्टर जास्तीचे वापरावे.

### रासायनिक खते

■ ३० किलो नत्र, ६० किलो स्फुरद व ३० किलो पालाश प्रति हेक्टर पेरणीच्या वेळेस द्यावे. सिंगल सुपर फॉस्फेटद्वारे स्फुरद न दिल्यास गंधक २० किलो प्रति हेक्टरी द्यावे. ज्या ठिकाणी खोडमाशी व चक्री भुंग्याचा प्रादुर्भाव जास्त होतो तेथे पेरते वेळेस रासायनिक खतांसोबत शिफारशीत दाणेदार कीटकनाशक वापरावे.

### आंतरमशागत

■ पेरणीनंतर २० ते २५ आणि ३० ते ४५ दिवसांचे पीक असताना दोन कोळपण्या करून शेत तणविरहित ठेवावे.

### दुबार पीक पद्धत

■ कापूस अधिक सोयाबीनचे १:१ किंवा २:१ आणि सोयाबीन अधिक तूर ४:२ या प्रमाणात घ्यावे. सोयाबीन आधारित दुबार पीक पद्धतीत रब्बी ज्वारी किंवा करडई ही पीक पद्धती ओलिताखाली फायदेशीर राहील.

### पाणी व्यवस्थापन


■ सोयाबीन पिकाची फुलोऱ्याची व शेंगा भरण्याची अवस्था पाण्याच्या ताणास संवेदनशील आहेत. या कालावधीत १५ ते २० दिवसांचा पावसाचा खंड पडल्यास संरक्षित पाणी देणे आवश्यक आहे.

## खरीप : फुलपिके लागवडीसाठी उत्तम हंगाम

**खरीप हंगामात पाऊस भरपूर पडत असल्याने हा हंगाम फुलझाडांच्या लागवडीसाठी उत्तम असतो. मात्र या पिकांच्या लागवडीसाठी चांगला निचरा असलेली व भरपूर सेंद्रिय पदार्थयुक्त जमिनीची निवड करावी. व्यापारी उत्पादनासाठी तसेच शोभेसाठी म्हणून या पिकांची लागवड करताना सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करावा.**

खरीप हंगामात झेंडू, गॅलार्डिया, ॲस्टर, शेवंती, चांदणी, झिनिया, कॉसमॉस, सूर्यफूल, टिथोनिया, बाल्सम, सिलोसिया, गॉम्फ्रेना, सालव्हिया, हॉलीहॉक, कॉक्स कोंब इत्यादी फुलझाडांच्या लागवडीसाठी अनुकूल काळ असतो. यापैकी झेंडू, ॲस्टर, गॅलार्डिया, चांदणी, डेझी इत्यादी फुलझाडांची व्यापारी तत्त्वावर लागवड केली जाते. इतर फुलांची बागांमध्ये ताटवे करून लागवड केली जाते. सुट्या फुलांसाठी ॲस्टर, झेंडू, गॅलार्डियाची लागवड केली जाते. कट फ्लॉवरसाठी ॲस्टर, कॉक्स कोंब, अमरॅन्थस ही फुलझाडे लावतात तर फिलरसाठी सोनतुरा हे पीक लावतात.





### अभिवृद्धी अन् लागवड पद्धत

खरीप लागवड ही बियापासून केली जाते. बहुतांश पिकांच्या बिया लहान असल्यामुळे रोपे तयार करावीत. रोपे गादीवाफा किंवा लाकडी ट्रे किंवा कुंड्यांमध्ये तयार करावीत. पावसाळ्याच्या सुरुवातीला वाफ्यावर बियांची पेरणी करावी. बी पेरणीपूर्वी बियाणास कॅप्टन २ ग्रॅम प्रतिलिटर चोळावे. बी जमिनीत अर्धा ते एक सें. मी. खोल पेरावे. पेरणीसाठी दोन ओळीतील अंतर १० सें. मी. ठेवावे. पेरणीनंतर बी बारीक माती व शेणखत यांच्या मिश्रणाने झाकावे व ताबडतोब पाणी द्यावे. उगवणीनंतर पाणी देणे, तण काढणे आदी कामे वेळेत करावीत. रोपांची पुनर्लागवड ४-५ पाने आल्यावर किंवा रोपांची उंची १०-१५ सें. मी. झाल्यावर करावी. वाफ्यावरून रोपे उपटण्यापूर्वी रोपांना हलके पाणी द्यावे. म्हणजे रोपे उपटताना मुळांना इजा होणार नाही. ढगाळ हवामानात रोपांची पुनर्लागवड करावी. रोप लागवडीनंतर पाणी द्यावे. झेंडू, ॲस्टर, चांदणी, झिनिया, कॉसमॉस, गॅलार्डिया, सालव्हिया, टिथोनिया या फुलझाडांची रोपे तयार करून लागवड करतात. शेवंती, झेंडू लागवड कोवळ्या छाट्यापासून रोपे तयार करून करतात. शेवंती व डेझीची लागवड फुटव्यापासूनही करता येते. सूर्यफूल, हॉलीहोक आदी फूलझाडांच्या बिया असतात. त्यामुळे त्यांची लागवड सरळ बी फेकून केली जाते. निशिगंधाची लागवड कंद लावून करतात. कंपनीकडूनच बियाणे प्रक्रिया केली असल्यास पुन्हा वेगळी करू नये.

### लागवडीचे अंतर अन् वेळ

**फुलझाडांची वाढ व जमिनीच्या मगदुरानुसार लागवड ३० बाय ३०, ३० बाय ४५ अथवा ४५ बाय ४५ सें.मी. अंतरावर करावी. लागवड जून-जुलै महिन्यात करावी.**



### खते अन् पाणी व्यवस्थापन

■ लागवडीवेळी प्रतिहेक्टरी १०० किलो नत्र, २०० किलो स्फुरद, २०० किलो पालाश द्यावे. लागवडीनंतर एक दे दीड महिन्याच्या अंतराने उरलेली नत्राची मात्रा १०० किलो प्रतिहेक्टरी याप्रमाणात द्यावी. दर्जेदार व भरपूर उत्पादनासाठी पीक बहरात असताना २ टक्के (२० ग्रॅम प्रतिलिटर) युरियाची फवारणी करावी. निंदणी करताना रोपांना मातीची भर द्यावी. पिकांना पाऊस नसेल तर आवश्यकतेनुसार पाणी द्यावे. जादा पाऊस झाल्यास पाण्याचा योग्य निचरा होईल याची काळजी घ्यावी.

### असे हवे हवामान

■ खरीप हंगामी फुलझाडांना उष्ण व दमट हवामान चांगले मानवते. चांगल्या वाढीसाठी दिवसाचे २५-३० अंश सेल्सिअस व रात्रीचे १५-२० सेल्सिअस तापमान लागते. सरासरी १५-२५ सेल्सिअस तापमानात चांगली वाढ होते. हवेतील चांगला दमटपणा व ६० ते ७० टक्के आर्द्रता या पिकांना मानवते.

### अशी हवी जमीन

■ उत्तम वाढीसाठी चांगल्या निचऱ्याची मध्यम जमीन (सामू ६.५) निवडावी. जमीन सेंद्रिय पदार्थांनी समृद्ध असावी. कुंडीमध्ये लागवडीसाठी एक भाग शेणखत अधिक एक भाग पोयट्याची माती असे १:१ प्रमाणाचे मिश्रण तयार करून केलेले माध्यम वापरावे.

### अशी करा पूर्वमशागत

■ एकदा खोल नांगरट व दोनवेळा कोळपणी करुन जमीन भुसभुशीत करून घ्यावी. शेवटची कोळपणी करताना हेक्टरी ३० टन शेणखत मातीत चांगले मिसळावे. पूर्वमशागतीनंतर सपाट वाफे किंवा सरी वरंबे तयार करावेत. कुंडीतील लागवडीसाठी कुंडीच्या तळाशी वाळलेला पालापाचोळा टाकून माती मिश्रणात १००-१५० ग्रॅम १५:१५:१५ हे खत मिसळून कुंड्या भराव्यात. कुंड्या भरताना वरुन एक ते दीड इंच मोकळ्या राहतील याची काळजी घ्यावी.

## शॉर्ट न्यूज

### वाळू वाहतूक करणारी पिकअप पकडली

■ **नेवासा :** तालुक्यातील शिरेगाव येथे खेडले परमानंद रोडवर असलेल्या लक्ष्मी मंदिरासमोर पिकअपद्वारे वाळू वाहतूक करतानान एकाला पकडले. पिकअपमध्ये एक ब्रास वाळू मिळून आली. गुन्हे शाखेचे पोलीस कॉन्स्टेबल ज्ञानेश्वर शिंदे यांच्या फिर्यादीवरून सोनई पोलीस ठाण्यात नितीन रामदास माळी (वय २३, रा. मांजरी, ता. राहुरी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. रात्री साडेअकराच्या सुमारास नितीन रामदास माळी हा पिकअपमध्ये गौण खनिज वाळूची विनापरवाना एक ब्रास वाळू चोरून नेताना मिळून आला.

### तृप्ती गाडेकर यांची अभियंतापदी निवड

■ **पारनेर :** भूमी अभिलेख कार्यालयातील कनिष्ठ लिपिक तृप्ती सुरेश गाडेकर यांची नुकतीच अहमदनगर जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा व ग्रामीण विभागाच्या कनिष्ठ अभियंतापदी निवड झाली. नुकत्याच झालेल्या स्पर्धा परीक्षेद्वारे गाडेकर यांची निवड झाली आहे. गाडेकर या संगमनेर तालुक्यातील आंबी खालसा येथील असून, त्यांचे प्राथमिक शिक्षण ही येथीलच प्राथमिक शाळा व माध्यमिक शिक्षण ही ग्रामीण भागात झाले आहे.

### दूध उत्पादकांचा अंत पाहू नका

■ **हरेगाव :** राज्य शासनाने दूध प्रश्नात तात्काळ लक्ष घालावे, अन्यथा २५ जून रोजी हरेगाव येथे बेमुदत रास्ता रोको करण्यात येईल, असा इशारा दूध उत्पादक शेतकऱ्यांनी दिला असल्याचे शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष व दूध उत्पादक अनिल औताडे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. श्रीरामपूर तालुक्यातील उंदीरगाव येथील दूध उत्पादक शेतकऱ्यांनी शेकडो सह्यांचे निवेदन तहसीलदार मिलिंद कुमार वाघ व श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांना दिले.

### श्रीगोंद्यात वीज प्रश्नावर भीक मांगो आंदोलन

■ **श्रीगोंदा :** शहरासह तालुक्यात सुरू असलेला विजेच्या लपंडावाबाबत श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर आंदोलन करून देखील विजेच्या प्रश्नावर सुधारणा झाली नाही. तसेच मागील तीन महिन्यांपासून कंत्राटी कामगारांना पगार, तसेच श्रीगोंदा शहरातील जुनी लाईन दुरुस्त करण्यासाठी साहित्य पुरवठा होत नसल्याने टिळक भोस यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी भीक मांगो आंदोलन केले. या आंदोलनात जमा झालेली तीन हजार ५७० रुपये अधीक्षक अभियंता खांडेकर, कार्यकारी अभियंता माळी, तसेच सुर्यवंशी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.

### रिपाइंच्या वतीने पोलीस अधीक्षकांना निवेदन

■ **नगर :** पारनेर तालुक्यातील गोरेगाव येथील दलित समाजातील महिलेला खासदार नीलेश लंके यांच्या समर्थकांनी घरात जाऊन केलेल्या मारहाणीची व अत्याचाराची घटना अतिशय गंभीर आहे. यामधील आरोपींना जामीन होणार नाही, अशा पद्धतीची कारवाई करावी, अशी मागणी रिपाइंतर्फे जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, नगर दक्षिणचे जिल्हाध्यक्ष संजय भैलुमे, युवा जिल्हाध्यक्ष पप्पू बनसोडे, पारनेरचे तालुकाध्यक्ष राजू उबाळे, राजा जगताप, बाबा राजगुरू, करण कोळगे, अमित काळे, अजय सोनवणे आदी उपस्थित होते.

# साहित्यिक रज्जाक शेख यांचा सन्मान

## वर्ल्ड कॉन्स्टिट्युशन पार्लमेंट असोसिएशनकडून गौरव

**श्रीरामपूर : प्रतिनिधी**

**वर्ल्ड कॉन्स्टिट्युशन पार्लमेंट असोसिएशनकडून श्रीरामपूरचे प्रसिध्द कवी,गझलकार तथा जीवन गौरव मासिकाचे सहसंपादक रज्जाक शेख यांना लोकमान्य टिळक सभागृह श्रीरामपूर येथे राज्यस्तरीय पुरस्कार वितरण व कविसंमेलनात सन्मानित करण्यात आले.**




यावेळी व्यासपीठावर संस्थेचे राज्यप्रमुख डॉ.दत्ता विघावे,कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ साहित्यीक आनंदा साळवे, सामाजिक कार्यकर्त्या संगिता जामगे,माजी सरपंच ढोकचौळेताई,बतरासेठ,अभिनव खानदेश साप्ताहिकाचे संपादक प्रभाकर सूर्यवंशी,स्वामिराज कुलथे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. बाप या विषयावर झालेल्या राज्यस्तरीय काव्यसंमेलनात फारच रंगत आली.

श्रीरामपूर तालुक्यातील खोकर नावाच्या एका छोट्याशा खेड्यात जन्म झालेल्या रज्जाक शेख यांचा साहित्य प्रवास कौतुकास्पद आहे असे उद्गार अध्यक्षांनी काढले. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर सलग चौथ्यांदा निवड झाली आणि राज्यभरात शंभराहून अधिक संमेलनातून करत असलेल्या प्रबोधनपर कवितांच्या सादरीकरणाबद्दल शेख यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

राज्यातील विविध वृत्तपत्रातून ''खेळू करू शिकू'' या शासकीय पुस्तकाचे समीक्षण करून लेखाद्वारे सर्व राज्यभर प्रसिद्धी दिली. तसेच जिल्हा परिषदेच्या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्यांतर्फे शैक्षणिक कविसंमेलनात दोनदा काव्यसादरीकरणाची संधी मिळाली. राज्यभरातील विविध वृत्तपत्रांमध्ये आपल्या बालकविता व शेतीमातीच्या जवळपास पंधराशे कविता प्रकाशित केल्या. विविधसाहित्य मंचावरुन त्यांना पुरस्कार देवून पुरस्कृत केले गेले. त्याबद्दल त्यांचे राजकीय ,सामाजिक आणि साहित्यिक मित्रांकडून अभिनंदन होत आहे.

# अहंकार नको, सहमतीने देश चालवा

## मोहन भागवतांनी टोचले केंद्र सरकारचे कान

**नागपूर: प्रतिनिधी**

**'गेल्या दहा वर्षांत देशाची आर्थिक, सामरिक स्थिती सुधारली आहे. विश्वात देशाचे नाव उंचावले आहे. कला, क्रीडा, संस्कृती, विज्ञानाच्या क्षेत्रात आपण प्रगती करतोय. पण, याचा अर्थ आपल्यापुढील सर्व आव्हाने संपलेली नाहीत. ती संपविण्यासाठी सहमतीने देश चालवायला हवा. केलेल्या कार्याचा अहंकार न ठेवता प्रतिपक्षाच्या मताचा आदर करत देशाचे संचालन व्हावे,' अशा शब्दांमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी सोमवारी केंद्र सरकारचे कान टोचले.**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्ता विकास वर्ग द्वितीयचा समारोप सोहळा रेशीमबाग मैदानावर झाला. यावेळी शिक्षार्थींना संबोधित करताना सरसंघचालक डॉ. मोहन भागवत बोलत होते. व्यासपीठावर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून श्री क्षेत्र गोदावरी धाम बेट सराला येथील पिठाधीश रामगिरी महाराज, वर्गाचे सर्वाधिकारी इकबाल सिंह, प्रांत संघचालक दीपक तामशेट्टीवार, नागपूर महानगर संघचालक राजेश लोया यांची उपस्थिती होती.

स्वत:चेच बरोबर आहे असे मानत इतरांच्या मताचा आदर न करणे योग्य नसल्याचे सांगत



सरसंघालक भागवत म्हणाले,'सर्वांची शंभर टक्के मते मिळणे शक्य नाही. मात्र, चित्त वेगवेगळे असूनदेखील सोबत चालायचे आहे असे मानल्यास सहचित्त होते. निवडणूक ही स्पर्धा असली तरी युद्ध नाही. प्रतिपक्ष अर्थात विरोधी पक्षदेखील महत्त्वाचा असून तो दुसरा पैलू मांडत असतो. दोन्ही बाजू समोर याव्यात यासाठीच संसद असते. तेव्हा सर्वांनी एकत्रित होऊन चालायला हवे. दुसऱ्यांच्या मताचा सन्मान करायला हवा.' रामगिरी महाराज म्हणाले,'आपल्या सनातन संस्कृतीला नष्ट करण्याचे परकीयांनी अनेक प्रयत्न केलेत. पण, संतपरंपरा व समर्पण भावाने कार्य करणाऱ्यांमुळे भारतीय संस्कृती आजही अबाधित आहे. काही वर्षांपूर्वी आपल्या समाजातील एका वर्गाला क्षुद्र म्हणत त्रास देण्यात आला. आता ही चूक सुधारण्याची वेळ आली आहे. समाजात सर्वच समान आहेत, हा विचार दृढ व्हायला हवा.' तत्पूर्वी, देशभरातून आलेल्या ९३६ शिक्षार्थींनी प्रात्यक्षिक सादर केले.

# झावरेंच्या हल्लेखोरांच्या कोठडीत दोन दिवसांची वाढ

## ■ पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांची माहिती ■ इतर आरोपी अद्यापही फरारच

**पारनेर : प्रतिनिधी**

**खासदार नीलेश लंके यांचे निकटवर्तीय, नीलेश लंके प्रतिष्ठानचे सचिव ॲड. राहुल झावरे यांच्यावरील जीवघेण्या हल्ल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या मा. नगराध्यक्ष विजय औटी यांच्यासह इतर तीन दोन आरोपींच्या पोलीस कोठडीत मंगळवारी पारनेरच्या न्यायालयाने दोन दिवसांची वाढ केली. दरम्यान, या प्रकरणातील इतर आठ आरोपी अद्यापही फरार आहेत.**



गेल्या गुरूवारी दुपारी सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास ॲड. राहुल झावरे यांच्यावर पारनेरच्या आंबेडकर चौकात मा. नगराध्यक्ष विजय सदाशिव औटी, मा. नगरसेवक नंदू सदाशिव औटी, प्रितेश पानमंद, अंकुश भागाजी ठुबे, नीलेश उर्फ धनू दिनकर घुमटकर, संगम सोनवणे, नामदेव लक्ष्मण औटी, मंगेश सुभाष कावरे, पवन बाबा औटी, प्रमोद जगन्नाथ रोहोकले, प्रथमेश दत्तात्रेय रोहोकले, सुरेश अशोक औटी व इतर ३ ते ४ अनोळखी इसमांनी जीवघेणा हल्ला केला होता. त्यात झावरे हे गंभीर जखमी झाले असून सध्या त्यांच्यावर नगरच्या खाजगी रूग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

झावरे यांच्यावरील हल्ल्यानंतर पोलीसांनी विजय औटी, नंदू औटी, प्रितेश पानमंद व मंगेश कावरे या आरोपींना अटक केली होती. त्यांच्यासह इतर आरोपींवर खुनाचा प्रयत्न तसेच आर्म ॲक्टच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गेल्या शुक्रवारी चारही आरोपींना न्यायालयापुढे उभे करण्यात आले त्यावेळी त्यांना न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी दिली होती. न्यायालयीन कोठडीची मंगळवारी मुदत संपल्याने आरोपींना मंगळवारी दुपारी न्यायालयापुढे उभे करण्यात आले असता न्यायालयाने त्यांच्या पोलीस कोठडीत आणखी दोन दिवसांची वाढ केल्याचे पारनेर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समिर बारवकर यांनी सांगितले.

# ईव्हीएमचा डेटा ४५ दिवस जतन करणार

## ४५ दिवस तक्रार करण्याचा कालावधी

**नगर : प्रतिनिधी**

**अहमदनगर, शिर्डी लोकसभा मतदारसंघासाठी मतमोजणी झाल्यानंतर पुढील ४५ दिवस ईव्हीएम मशिन एमआयडीसीतील वखार महामंडळाच्या गोदामात बंद राहणार आहे. या दरम्यान कोणी निवडणूक आयोगाकडे इलेक्शन पिटीशन दाखल केली. तर त्यानंतर निकाल लागेपर्यंत ईव्हीएम**



**वखार महामंडळाच्या गोदामात बंद राहतील. अन्यथा ४५ दिवसानंतर निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार मशिन्स आयोगाकडे पाठवले जातील, अशी माहिती निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली.**

मतदानाची आकडेवारी आणि मतमोजणी आकडेवारी यात तफावत असल्याची आत्तापर्यंत कोणतीही तक्रार निवडणूक आयोगाकडे आलेली नाही.


# राज्याच्या विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन २७ जूनला

## मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

**राज्याचे पावसाळी अधिवेशन १० जून रोजी होणार होते. मात्र, आता हे अधिवेशन २७ जूनपर्यंत पुढं ढकलण्यात आले आहे. नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाची घोषणा करण्यात आली आहे.**

**लोकसभेच्या निकालामुळे महायुतीमध्ये नाराजी पसरली आहे.** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीमध्ये पावसाळी अधिवेशनाबाबत घोषणा करण्यात आली आहे. राज्याचे पावसाळी अधिवेशन



येत्या २७ जून रोजी पार पडणार आहे. लोकसभा निवडणूक पार पडल्याने आचारसंहिता संपली आहे. मात्र, राज्यात विधान परिषदेच्या मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक तसेच मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा चार जागांकरिता निवडणूक होत आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या या भागात आचारसंहिता कायम राहणार असल्याने अधिवेशन पुढे ढकलण्यात आले.









# कर्मयोगी ठ. ल. राऊत काळाच्या पडद्याआड

## राळेगणसिध्दी परिवारावर शोककळा

राळेगणसिध्दी : प्रतिनिधी

**ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या मार्गदर्शनाखालील संत निळोबाय विद्यालयाचे माजी प्राचार्य, हिंद स्वराज्य ट्रस्टचे विश्वस्त कर्मयोगी ठ. ल. राऊत यांचे रविवारी रात्री हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ८० वर्षांचे होते. संत निळोबाराय विद्यालय तसेच राळेगणसिध्दीच्या विविध उपक्रमांसाठी राऊत यांनी झोकून दिले होते. त्यांच्या निधनामुळे राळेगणसिध्दी परिवारावर शोककळा परसली आहे.**

रविवारी रात्री जेवणानंतर राउत यांना काहीसा त्रास झाला आणि त्यांची प्राण ज्योत मालवली. त्यांना रूग्णालयातही दाखल करण्यात आले मात्र त्यांचे त्यापूर्वीच निधन झाल्याचे डॉक्टरांनी जाहिर केले. सोमवारी सकाळी राळेगणसिध्दी येथे शोकाकूल वातावरणात राउत यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

स्व. राऊत हे कर्जत तालुक्यातील निमगांव डाकू या गावचे मुळ रहिवासी. साधारण १९८१ मध्ये ते राळेगणसिध्दी येथे ते दाखल झाले. सन २००२मध्ये ते प्राचार्य पदावरून निवृत्त झाले. ८० च्या दशकात राळेगणसिध्दीत दाखल झालेले ठ. ल.राऊत हे अखेरपर्यंत राळेगणसिध्दी परिवाराचे सदस्य राहिले. सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी राळेगणसिध्दी हिच कर्मभुमी माणून राळेगणसिध्दीतच वास्तव्य करणे पसंत केले. अखेरपर्यंत ते अण्णांच्या नेतृत्वाखालील हिंद स्वराज ट्रस्टचे विश्वस्त होते.



### अण्णांचे स्वप्न पुर्ण केले

अण्णांच्या स्वप्नातील नापासांच्या शाळेतील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे, त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावेत हा अण्णांचा आग्रह असे. त्यानुसार राऊत सर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत. वसतिगृहामध्ये व्यसनमुक्तीपासून शिस्त, जादा अभ्यासाचे नियोजन करून प्रत्येक विद्यार्थी उत्तीर्ण होईपर्यंत राऊत सरांचे प्रयत्न कधीही थांबले नाहीत. त्यामुळे उनाड मुले, नापास मुले उत्तीर्ण तर झाले शिवाय संस्कारीत होऊन आज समाजामध्ये आपले वेगळेपण सिध्द करीत आहेत.

### विद्यालय हेच मंदिर

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या स्वप्नातील नापासांच्या आदर्श शाळेचे स्वप्न स्व. राऊत यांनी प्रत्यक्षात उतरविले. अण्णांच्या विश्वसास पात्र ठरलेल्या स्व. राऊत यांनी संत निळोबाराय विद्यालय आले मंदिर मानले होते. पहाटे ५ वाजता वसतीगृहातील विद्यार्थ्यांच्या व्यायामापासून रात्री साडेनऊ वाजेपर्यंतचे त्यांचे वेळापत्रक व्यस्त असायचे.

### माझ्या बाल गोपाळांनो !

स्व. राऊत हे वर्गात गेल्यानंतर अथवा कोणत्याही ठिकाणी संवाद साधताना माझ्या बाल गोपाळांनो या शब्दाने ते सुरूवात करीत त्यामुळे विद्यार्थी व सरांमध्ये एक आपुलकीचे नाते निर्माण झाले होते.

### श्रमदानातून वृक्षसंवर्धन

विद्यार्थी शिक्षणात हुशार असलाच पाहिजे परंतू त्याचे शरीरही सुदृढ असले पाहिजे यासाठी त्यांनी नेहमीच श्रमदानाचा आग्रह धरला. आज वाडेगव्हाण फाटा ते राळेगणसिध्दी दरम्यान जी झाडांची रांग दिसते त्याची मुळ संकल्पना राऊत सरांची. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना देव माणून राऊत सरांनी त्यांच्या प्रत्येक उपक्रमात सहभाग नोंदविला.

### राऊत सरांनी पंचसुत्री अंगीकारली

राऊत सरांनी आपल्या पंचसुत्रीप्रमाणे आयुष्यभर काम केले. ते प्रथम राळेगणसिध्दीमध्ये आले त्यावेळी ते मला त्यांच्या पत्नीसह यादवबाबा मंदिरात भेटले. ते शाळेतून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी आपल्या गावी न जाण्याचा निर्णय घेतला आणि राळेगणसिध्दी परिवार व हिंद स्वराज ट्रस्टसाठी आपले जीवन सपर्पित केले.

अण्णा हजारे, ज्येष्ठ समाजसेवक

### सरांनी असंख्य विद्यार्थी घडविले

राऊत सर आपल्यात नाहीत. त्यांच्या मार्गदर्शनातून असंख्य विद्यार्थी, विद्यार्थीनी घडले. आपले शाळेलाच आपले मंदिर माणून सरांनी काम केले. माझ्यासारखे असंख्य विद्यार्थी त्यांनी घडविले. आदरणीय प्राचार्य स्व. राऊत सरांना सर्व आजी माजी विद्यार्थ्यांकडून भावपूर्ण श्रध्दांजली.

दत्ता आवारी, माजी विद्यार्थी

### नितळ मायेचा अविरत झरा

आदरणीय अण्णासाहेबांच्या नापास विद्यार्थ्यांच्या शाळेचे स्वप्न सत्यात उतरविणारे आणि असंख्य विद्यार्थ्यांना घडविणारे प्राचार्य ठ.ल.राऊत सर यांचे हृदय विकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाले. आरणीय राऊत सर म्हणजे एक नितळ मायेचा अविरत झरा. सर तुमच्या कौतुकाची थाप परत पाठीवर पडणार नाही याची कल्पना करवत नाही. असंख्य आठवणी आहेत आणि राहतील.

सुरेश पठारे, माजी विद्यार्थी, उद्योजक

### राळेगणसिध्दी परिवाराचा आधारवड

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना अभिप्रेत असलेले साामजिक, शैक्षणिक कार्य ठ. ल. राउत सरांनी केले. सर कर्जत तालुक्यातील असले तरी त्यांनी अखेरपर्यंत राळेगणसिध्दी परिवारातच राहणे पसंत केले. अखेरच्या श्वसासापर्यंत सर अण्णा हजारे यांच्या कार्यात सहभागी होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हजारो विद्यार्थी आज आपल्या जीवनात यशस्वी वाटचाल करीत आहेत.

जयसिंग मापारी, सरपंच, राळेगणसिध्दी

# चोंभेश्वर पतसंस्थेचा पहिला वर्धापन दिन साजरा

## संस्थापक खंडू म्हस्के यांच्यावतीने १००आंब्याच्या झाडांचे वाटप




अळकुटी याठिकाणी चोंभेश्वर ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या वतीने सभासदांना वृक्ष वाटप करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवर

चोंभूत : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील अळकुटी येथील चोंभेश्वर ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचा पहिला वर्धापन दिन शंभर आंबा वृक्ष वाटप करून नुकताच संपन्न झाला. वर्धापन दिनी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी शिर्के, शंकरराव चौधरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.**

संस्थेचे संस्थापक खंडू म्हस्के यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी त्यांनी संस्थेची वार्षिक माहिती देत असताना संस्थेचे मार्गदर्शक गंगाधर दगडू शेळके साहेब हे वेळोवेळी मार्गदर्शन करत असतात असे नमूद केले. तसेच ह. भ. प. समजप्रबोधनकार निवृत्ती महाराज इंदोरीकर महाराज यांनी शुभेच्छा दिल्या हे नमूद केले.संस्थेचे सभासद, ठेवीदार,सर्व संचालक यांचे स्वागत केले.यावेळी डॉ. श्रीकांत पठारे, डॉ. भास्कर शिरोळे, ज्ञानदेव पानसरे, शरद घोलप, देवराज शेंडकर, प्रकाश कोल्हे, प्राचार्य मंगेश जाधव तसेच इतर पंचक्रोशीतील मान्यवरांनी संस्थेला सदिच्छा भेट दिली.

प्रमुख पाहुणे शिवाजी शिर्के उपस्थित होते त्यांनी मनोगत व्यक्त करताना सदर संस्था ही संस्थापक खंडू म्हस्के यांनी शून्यातून उभी केलेली आहे. संस्थेने लॉकरची सुविधा उपलब्ध केली असून संस्थेने आर्थिक विश्वासाची भूमिका पार पाडून संस्थेच्या प्रगतीचा आलेख उत्तरोत्तर वाढो अशा सदिच्छा दिल्या. तसेच डॉ. घोलप एल.बी सर यांनीही संस्थेला शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थापक खंडू म्हस्के यांनी केले तर आभार संस्थेचे व्हा. चेअरमन मारुती अमृता डेरे यांनी केले.

### संस्थेचे ध्येय : महिला सक्षमीकरण व पर्यावरण संवर्धन

संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रम बरोबरच महिला सक्षमीकरण व पर्यावरण संवर्धन हा प्रमुख हेतू आहे. यावर्षी संस्थेच्या वतीने प्रत्येक सभासदास केशर जातीच्या आंब्याची रोपे वाटप करण्यात आली. तसेच महिलांच्या स्वयं उद्योगासाठी स्वतंत्र कर्ज सुविधा,सोने तारण अंतर्गत महिलांना वाढीव कर्ज देण्याची सोय संस्थेमार्फत करण्यात आलेली आहे. यावर्षी नियोजित उपक्रमात आदर्श माता पिता पुरस्कार, पर्यावरण संवर्धन, शैक्षणिक उपक्रम, आदी उपक्रम राबवणार आहोत.

–खंडू म्हस्के
(संस्थापक/चेअरमन, चोंभेश्वर ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था अळकुटी )

# निवृत्तीनंतर सामाजिक कार्यासाठी वेळ द्यावा

## दिपक लंके यांचे प्रतिपादन




(छाया - शरद रसाळ, सुपा)

सुपा : प्रतिनिधी

**नोकरी करत आपले कर्तव्य पार पाडत असताना कुटुंबासाठी समाजासाठी किंवा आपले छंद जोपासण्यासाठी आवश्यक तेवढा वेळ देता येत नाही. तेव्हा आयुष्यात राहुन गेलेल्या गोष्टी निवृत्तीच्या काळात करावयाच्या असतात असे प्रतिसाद युवा नेते दिपक लंके यांनी केले आहे.**

रविवारी ते म्हस्केवाडी येथे श्री तुळशीराम म्हस्के यांच्या टपाल खात्यातील पोस्टमन म्हणून सेवापुर्ती कार्यक्रमात म्हस्के यांचा सन्मान करताना प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

श्री तुळशीराम म्हस्के हे नुकतेच टपाल सेवेतुन निवृत्त झाले आहेत. रविवारी म्हस्केवाडी ग्रामस्थ व म्हस्के परिवाराने त्यांच्या सेवापुर्ती समारंभ आयोजित केला होता यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर व म्हस्के परिवारावर प्रेम करणारे हजारो नागरिक यावेळी उपस्थित होते.

यावेळी जेष्ठ नेते डॉ.भास्कर शिरोळे यांनी शुभेच्छा देताना सांगितले कि, ज्याकाळी दळणवळणाचे काही साधन नव्हते तेव्हा पोस्टमन हा एकमेव दुत असा होता जो माणसे जोडत असे एक मेकांचे पत्र निरोप पोहचवणे सुख दुखाःच्या घटना कळवणे यासाठी पोस्ट देवदुतापेक्षा कमी नव्हता. यावेळी डॉ.शिरोळे यांनी म्हस्के यांना पुढील आयुष्य निरोगी व उदंड मिळो अशा शुभेच्छा दिल्या.
यावेळी शिवसेना तालुका प्रमुख ( उबाठा ) डॉ श्रीकांत पठारे आपल्या शुभेच्छा देताना म्हणाले की, नोकरी काळात कर्तव्य पार पाडत असताना आपल्या आवडी निवडी आपले छंद यांना मुरड घातलेली असते तेव्हा आता निवृत्तीनंतर राहुन गेलेले देवदर्शन, पर्यटन कुटुंबासाठी वेळ देऊन उर्वरीत आयुष्य आनंदात जगावे अशा शुभेच्छा दिल्या. यावेळी कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी श्री तुळशीराम म्हस्के यांच्या अनेक आठवणी सांगितल्या. अनेकांनी त्यांनी केलेली मदत सांगितली तर अनेकांनी त्यांच्या गावातील सामाजिक कार्य सांगत आठवणींना उजाळा दिला.

यावेळी तुळशीराम म्हस्के याचे पुत्र इंजिनियर नवनाथ म्हस्के यांनी आपले मनोगत व्यक्त करताना घरातील संस्कार , शिस्त यामुळे आम्ही कसे घडलो घरची हालाकीची परिस्थीती असतानाही वडीलांनी कर्तव्याला प्राधान्य दिले हे सांगताना नवनाथ भाऊक झाले. तर सुनबाईनीही आपल्या संसर्गाविषयी मोठी कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दुधाडे साहेब होते तर कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते यात राजकीय धार्मिक सामाजिक सह पोस्ट खात्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी ग्रंथालय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते . म्हस्केवाडी ग्रामपंचायतचे सरपंच सदस्य सेवा सोसायटी चे चेअरमन संचालक मंडळ आप्तेष्ट नातेवाईक व तुळशीराम म्हस्के यांना मानणारा मोठा जनसमुदाय यावेळी उपस्थित होता. श्री संदीप म्हस्के सरांनी प्रस्तावना करत सुत्रसंचलन केले तर श्री नवनाथ म्हस्के यांनी आभार मानले.

# मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या अध्यक्षपदी शांताराम लंके

## उपाध्यक्षपदी वसंत कवाद यांची बिनविरोध निवड



निघोज : प्रतिनिधी

**मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या अध्यक्षपदी माजी उपाध्यक्ष तथा कन्हैया दूध उद्योग समूहाचे अध्यक्ष शांताराम लंके यांची तसेच उपाध्यक्षपदी बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन वसंत कवाद यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.**

ट्रस्ट कोषाध्यक्षपदी मळगंगा कंट्रक्शनचे संस्थापक अध्यक्ष अमृताशेठ रसाळ, सचिवपदी बाबासाहेब कवाद ग्रामीण विकास सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष शांताराम कळसकर, सहसचिवपदी लोकनेते नीलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी विश्वास शेटे तसेच संघटकपदी निघोज कृषी फलोद्यान सहकारी संस्थेचे माजी चेअरमन रामदास वरखडे यांची निवड करण्यात आली आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी प्रभाकर कवाद यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या विश्वस्त मंडळ बैठकीत या निवडी करण्यात आल्या आहेत. ट्रस्टचे माजी अध्यक्ष तथा निवडणूक अधिकारी प्रभाकरशेठ कवाद यांनी या सर्व निवडीच्या सुचना मांडल्या यावेळी सर्व विश्वस्त मंडळाने टाळ्या वाजवून या बिनविरोध निवडीला मान्यता दिली. नुकतीच या ट्रस्टची निवडणूक मोठ्या चुरशीने झाली यामध्ये सत्ताधारी मंडळाला वीस तसेच विरोधी गटाला एक जागा मिळाली विरोधी गटाचे चार ते पाच उमेदवार कमी मतांनी पराभूत झाले.यापूर्वी प्रभाकर कवाद हे अध्यक्ष तसेच ज्ञानदेव लंके हे कोषाध्यक्ष होते. संघटक पदाची जबाबदारी अ‍ॅड. बाळासाहेब लामखडे यांच्याकडे होती तसेच शिवाजीराव वराळ हे विश्वस्त होते. मात्र निवडणूक बिनविरोध होण्यासाठी या मान्यवरांनी प्रयत्न केले तसेच ईतरांना संधी मिळावी तसेच निवडणूक बिनविरोध होण्यासाठी त्यांनी मोठ्या मनाने उमेदवारी अर्ज मागे घेतले. मंगळवार दि.११ रोजी झालेल्या बैठकीला सर्व विश्वस्त मंडळ उपस्थित होते. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी प्रभाकर कवाद व सहाय्यक निवडणूक अधिकारी महेश ढवळे यांनी पदाधिकारी निवडीचे काम पाहिले. सर्व बिनविरोध पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# अ‍ॅड राहुल झावरे यांना भेटण्यासाठी रुग्णालयात गर्दी करु नका

## खासदार नीलेश लंके यांचे आवाहन

नगर : प्रतिनिधी



**नीलेश लंके प्रतिष्ठानचे सचिव व मार्गदर्शक अ‍ॅड राहुल झावरे यांच्यावर नगर येथील सुरभी रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून त्यांची तब्येत आता स्थिर आहे. त्यांना भेटायला येणाऱ्या हितचिंतक आणि मित्रमंडळी यांची प्रचंड मोठी संख्या आहे. परंतु यामुळे रुग्णालयातील इतर रुग्णांच्या सेवेत व्यत्यय येत आहे. तरी त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या कुणीही त्यांना तुर्तास तरी भेटण्याचा आग्रह करू नये व हॉस्पिटलला येऊन गर्दी करू नये, असे आवाहन नवनिर्वाचित खासदार नीलेश लंके यांनी केले आहे.**

राहुल झावरे यांच्यावर दोन-तीन दिवसांपुर्वी झालेल्या प्राणघातक हल्ल्यानंतर त्यांना नगर येथील सुरभी रुग्णालयात दाखल करण्यात आले. येथे त्यांना भेटायला येणारे कार्यकर्ते, मित्र, सहकारी, आप्तेष्ट यांची गर्दी उसळली आहे. त्यामुळे रुग्णालय प्रशासनाला अडचणींचा सामना करावा लागत आहे. हे लक्षात घेऊन लंके यांनी हे आवाहन केले आहे. दरम्यान, ते बरे झाल्यावर थोड्या ते दिवसात आपणा सर्वांना भेटतील. सर्वांच्या आशीर्वादाने , वैष्णोदेवीच्या कृपाशिर्वादाने , सद्गुरू नाना महाराजांचा असणारा आशीर्वाद व चरपटिनाथ तुकाई यांची कृपा यामुळे ते उपचारांना प्रतिसाद देत असून लवकर बरे होतील असा आशावादही लंके यांनी व्यक्त केला.

दरम्यान, राहुल झावरे यांच्यावर पारनेर येथे काहीजणांनी प्राणघातक हल्ला करून त्यांना जबर जखमी केले होते. त्यामुळे त्यांना नगर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# कांद्याचे भाव मोठ्या प्रमाणात वाढण्याची गरज

## रूपेश ढवण यांची मागणी

निघोज : प्रतिनिधी

**कांदा शेतकऱ्यांचा रोष केंद्र सरकारला समजल्याने सरकार जाग्यावर आले ही समाधानाची बाब असली तरी कांद्याचे भाव मोठ्या प्रमाणात वाढण्याची गरज असल्याची मागणी आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रवादीचे युवा नेते रूपेश ढवण यांनी केली आहे.**




केंद्रीय कृषी मंत्री शिवराज चौहान यांना पाठवलेल्या निवेदनात ढवण यांनी म्हटले आहे की गेली पाच वर्षात कांद्याला कमी भाव देऊन मोदी सरकारने कांदा उत्पादक शेतकरी कर्जबाजारी करण्याचे काम केले आहे. लाखो रुपयांच्या कर्जाखाली शेतकरी दबला असून कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा फटका लोकसभा निवडणुकीत बसला म्हणून केंद्र सरकारने कांदा निर्यात धोरण बदलले ही अभिनंदनीय बाब असली तरी कांदा उत्पादन खर्च पाहाता आत्ताचे वाढलेले भाव काहीच नाहीत यापेक्षा जास्त भाव कांद्याला मिळण्याची गरज आहे.

गेली पाच वर्षात शेतकरी पुर्णपणे कर्जबाजारी झाला आहे. महाराष्ट्रातील शेतकरी आणि विशेष करुन नगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कांदा उत्पादक मोठ्या प्रमाणात असूनही भाव नाही म्हणून मोठा आर्थिक फटका बसला आहे. अनेक वेळा कांद्याला हमी भाव द्या अशी मागणी आम्ही केली मात्र सरकारने मागणीचा गांभीर्याने विचार केला नाही म्हणून केंद्र सरकार मोदी सरकार असे असताना एडीए सरकार म्हणून आले हीच परिणीती झाली आहे यापुढे सरकारने शेतकऱ्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष करता कामा नये यासाठी कांद्याला सर्वाधिक भाव मिळण्याची गरज असल्याची मागणी ढवण यांनी केली आहे.

### कांदा प्रश्नासाठी अनेकवेळा आंदोलन

कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या मागणीसाठी रुपेश ढवण यांनी अनेक वेळा आंदोलन केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या निघोज दौऱ्यात ढवण यांनी कांद्याची माळ घालून पवार साहेब यांचे लक्ष वेधले होते त्यानंतर पवार साहेब यांच्या सिल्व्हर ओक या निवासस्थानी जाऊन ढवण यांनी कांदा प्रश्नावर चर्चा करुण निवेदन दिले आहे.

# पळवे खुर्दच्या जलसंधारणाच्या कामाला पावसाची दमदार साथ

## ओढे खोलीकरण, रुंदीकरणाच्या कामाचा परिणाम

सुपा : प्रतिनिधी



(छाया - शरद रसाळ, सुपा)

**पारनेर तालुक्यातील पळवे खुर्द गावात यंदा नाम फाउंडेशन टाटा मोटर्स आणि महाराष्ट्र शासन व ग्रामपंचायत पळवे खुर्द व लोकसहभागातून मोठ्या प्रमाणावर जलसंधारणाची कामे करण्यात आली. यामध्ये दोन तलावातील गाळ काढण्याचे तसेच गावातील ओढे खोलीकरण व रुंदीकरणाची कामे पूर्ण झाली आहेत.**

यंदा हवामान खात्याकडून भरपूर पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता त्याप्रमाणे पळवे खुर्द येथे सलग दोन दिवस झालेल्या मुसळधार पावसाने गावातील सर्व तलाव तसेच ओढे या मध्ये मोठ्या प्रमाणात पाणीसाठा जमा झाला आहे. यावेळी तलाव व ओढा खोलीकरण रुंदीकरण झाल्याने वाहून जाणारे पाणी हे पूर्णपणे साठले असून ह्याचा शेतीसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी फायदा होणार आहे.
गावामध्ये पाणीप्रश्न बिकट होऊन टँकर सुरू असतानाच पहिल्याच पावसाने दमदार हजेरी लावल्याने पिण्याचा पाणीप्रश्न सुटून शेतीसाठी पाणी उपलब्ध झाले आहे. यंदा जूनच्या पहिल्या पंधरवड्यात पाऊस सर्वत्र दमदार पडल्याने शेतकरीवर्गात खरिपाची पेरणी वेळेवर होणार असल्याने आनंदाचे वातावरण आहे.

नाम फाउंडेशन टाटा मोटर्स आणि महाराष्ट्र शासन व ग्रामपंचायत पळवे खुर्द यांनी केलेल्या कामाची निसर्गाने पावती दिल्याची भावना परिसरातील शेतकऱ्यांची आहे. पळवे खुर्द हे गाव फक्त पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने नाम फाउंडेशन व लोकसहभागातून झालेल्या कामामुळे पाणीसाठा वाढला असून शेतकरी तसेच ग्रामपंचायत पळवे खुर्द यांनी नाम फाउंडेशनचे आभार मानले आहेत.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com